REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018
UGC APPROVED JOURNAL NO. 48514

# "स्त्रीवादी मराठी कादंबरी : एक शोध"

डॉ. पंडित जी. राठोड
सहयोगी प्राध्यापक , डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय , अमरावती.

## प्रास्ताविक :




एकोणिसाव्या शतकातील एकूण जागरण व्यक्ती जीवनाला महत्त्वाचा आयाम देऊन गेले. पुढे विसाव्या शतकात समाजाच्या सर्वच स्तरांवर त्याला पूरक असे नवविचारांचे मंथन सुरू झाले. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान यांच्या विकासाची फलश्रुती म्हणून झालेला प्रज्ञाजाणिवांचा विकास व अलेले जीवनभान यांची परिणती म्हणून व्यक्तिजीवनात आणि सामाजिक जीवनात आमूलाग्र परिवर्तन होत गेले. साहित्य आणि समाज यांच्यात अनोन्य संबंध असल्याने साहित्यातही कालमान परिस्थितीनुरूप वेगवेगळी रूपे धारण करत गेले. साहित्यातील या बदलत्या रूपांचा वेध होण्यासाठी अभिजातवाद, सौंदर्यवाद, वास्तववाद, अतिवास्तववाद, मार्क्सवाद, रूपवाद, देशीवाद असे विविध वाद अस्तित्वात आले. या वादांमुळे साहित्यविषयक आकलनाच्या व मूल्यमापनाच्या दिशा अधिक विस्तृत आणि सखोल झाल्या.

मानवाच्या बौध्दिक व्यापारातील अत्यंत महत्वाची बाब असलेल्या साहित्याभ्यासातून समाजाच्या सर्व स्तरांमध्ये अस्तित्वभान येऊ लागले. साहित्यविषयक वादाची बिजे ही नेहमी अशा अस्तित्वभान निर्मितीच्या प्रक्रियेत असतात. विविध वाङ्मयीन वाद व यातून आलेले भान साहित्याच्या आकलनाला व मूल्यमापनाला नवे परिणाम देते. या वादापैकीच आधुनिक कालखंडामध्ये उदयास आलेला एक महत्त्वाचा वाद म्हणजे 'स्त्रीवाद' होय.

जगभरातील सर्वच स्त्रियांना कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या दरम्यान रहावे लागले. विविध प्रकारच्या शोषणाचे बळी ठरावे लागले आहे. अन्याय, अत्याचार निमूटपणे सहन करावे लागले आहेत. हे आपल्याला स्त्री जातीवर होणारे अन्याय आहे. आणि ते दूर करण्यासाठी संघर्ष करायला हवा; त्यासाठी हे अन्याय कोणकोणत्या प्रकारे होतात हे समजून घेतले पाहिजे, त्यांची कारणे शोधली पाहिजेत, त्या कारणांची मीमांसा केली पाहिजे याचे भान जसजसे स्त्रियांना येत गेले तसतसा या अन्यायाविरूध्दचा स्त्रियांचा लढा अधिक व्यापक व सूक्ष्मतर दिसते आहे, ती स्त्रीने प्रदीर्घ काळ केलेल्या संघर्षाची फलनिष्पत्ती आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय घटनेने स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने आणले. शिक्षणामुळे व कर्तृत्वाला संधी मिळाल्याने अनेक कर्तृत्वसंपन्न स्त्रियांनी स्वातंत्र्योत्तर काळात महनिय कामगिरी केली. स्त्री पुरूषापेक्षा कमी आहे ही धारणा व तद्भूत 'कमीपणा' स्त्रीवर लादलेला आहे. याचे भान स्त्रीला येऊ लागले. हे भान अल्पसंख्य स्त्रियांनी समाज जागृतीसाठी आणि हक्कासाठी विविध प्रकारच्या चळवळी सुरू केल्या. त्यातून एक स्वतंत्र 'स्त्रीवादी' दृष्टिकोण विकसित होत गेला. एकूणच जीवन व्यवहाराची तपासणी व मांडणी स्त्रीच्या दृष्टीने होऊ लागलीऋ समाजमनावर प्रभुत्व गाजवणाऱ्या साहित्याचा अभ्यासदेखील स्त्री जाणिवेतून झाला पाहिजे असा विचार रूजू लागला आणि या नव्या जाणिवेतून साहित्याचे पुनर्मूल्यांकन करण्यातून स्त्रीवाद उदयास आला.

## स्त्रीवाद : संकल्पना :

मनवी समाजव्यवस्थेत 'स्त्री' ही हजारो वर्षांपासून गुलाम, दास म्हणून जीवन जगत आहे. समाजाने 'स्त्री' या घटकाला वगळून अनेकदा सुधारणेचे प्रयत्न केले. शिवाय कालपरत्वे समाजाने अनेक परिवर्तने स्वीकारलेली होती. मात्र विकासाचा उत्कर्षबिंदू समाजाला गाठता आलेला नाही. कारण समाजाच्या विकास प्रक्रियेत समाजाचा निम्मा भाग गृहितच धरला जात नव्हता. परिणामी

विकासाला सर्वांगीण व सार्वत्रिक स्वरूपाचा अर्थ समाज देऊ शकलेला नाही. याची जाणीव ऐतदेशीयांना प्रबोधन काळात प्रकर्षाने झाली. म्हणून स्त्रियांना धर्म, संस्कृती, प्रथा, परंपरेच्या संमोहनातून मुक्त करून स्त्रियांच पर्यायाने समाजाचा, देशाचा, मानवाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न सुधारकांनी सुरू केला. पाश्चात्य ज्ञान–विज्ञान, साहित्य, कला, संस्कृती बरोबरच स्त्रीवादाची नवी जाणीवही बदलत्या काळात भारतीय समाजात मूळ धरू लागली होती. परिणामी देशकालपरिस्थितीचे संदर्भ घेऊन भारतीय स्त्रीवाद विकसित झाला. स्त्रीवद ही एक समताधिष्ठित सामाजिक पुनर्रचना करू पाहणारी सामाजिक व राजकीय स्वरूपाची विचारसरणी अहे. या स्त्रीवादाचा नेमका अर्थ स्पष्ट होण्यासाठी विविध व्याख्यांचा परामर्श घेणे महत्त्वाचे ठरते.

## स्त्रीवाद म्हणजे काय ?

स्त्रीवाद ही एक सामाजिक परिवर्तनवादी विचारसरणी आहे. **'Feminism'** या इंग्रजी शब्दाला मराठी पर्याय म्हणून 'स्त्रीवाद' ही संज्ञा वापरली जाते. Feminism  हा शब्द लॅटिन भाषेतील शब्द आहे. त्यामधील Femina या शब्दाचा अर्थ Woman असा आहे. इ.स. 1890 च्या दशकात Womanizam च्या ऐवजी Feminism हा शब्द सर्वप्रथम वापरला गेला. त्यानंतर एलिस रॉसी यांनी 1895 ला The Athenaeum या नियतकालिकात ग्रंथपरीक्षण लिहिताना प्रथम हा शब्द लेखनात वापरला आणि त्यानंतर तो सगळीकडे प्रसारित झाला. 'स्त्रीवाद' या शब्दाचा अर्थ एका उपेक्षित घटकांच्या मुक्तीचा अर्थ ध्वनित करतो. म्हणून ती समुहवाचक संज्ञा आहे.

टनेक पाश्चात्य व मराठी विचारवंतांच्या स्त्रीवादाच्या व्याख्या आहेत. त्यापैकी काही व्याख्या पुढीलप्रमाणे–

• **(1) सिमॉन दि बोव्हुआर –** "'स्त्रीवाद' म्हणजे केवळ स्त्री हक्कांचे समर्थन नव्हे तर स्त्रीची 'स्त्री' अशी ओळख करून देणे, स्त्री प्रश्नांप्रती आस्था निर्माण करणे. "[1]

(2) "The Principle that women whould have political rights equal to those men." – Webster's Dictionary

**(3) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी –** "स्त्रीवाद ही केवळ सैध्दांतिक विचारप्रणाली नसून ती गतीशील आणि कृतीशील स्वरूपाची आहे. आपल्या भोवतालचे जग केवळ समजून घेणे एवढ्यापुरते तिचे उद्दिष्ट मर्यादित असून ती जग बदलण्याचा प्रयत्न करणारी विचारप्रणाली आहे."[2]

**(4) अश्विनी धोंगडे –** "स्त्रीवाद म्हणजे पुरूषांपासून फारकत घेऊन स्वतःचा सवतासुभा निर्माण करणे नव्हे, पण संस्कृतीच्या हजारो वर्षाच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारून तिला पशुतुल्य अवस्था प्राप्त करून दिली, त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करून घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे."[3]

वरील व्याख्यावरून थोडक्यात एवढेच सांगता येईल की स्त्रीवाद म्हणजे जीवनाच्या सर्वच पातळ्यावरील समानता होय.

## स्त्रीवादी साहित्याचे स्वरूप :

मनवी समाजरचनेत असलेले दुय्यम, दडपलेले स्थान उघडे करून एक निकोप भावना रूजण्याचे संस्कारपैलू स्त्रीवादी साहित्यात आहे. स्त्रीच्या खास भावानुभवांची अभिव्यक्ती व जगातील भौतिक घटनांकडे स्त्रीच्या दृष्टिकोनातून कसे पाहिले जाते? याचा अनन्यसाधारण आविष्कार स्त्रीवादी साहित्यात आढळतो. जगाचा नवा अवयार्थ लावणारे, नवी मूल्ये, नवी भाषा, नवे साहित्यिक आयाम व मापदंड निर्माण करणारे स्त्रीवादी साहित्य हे स्त्रीवादाप्रमाणेच एक बृहत् वर्तुळ आहे. स्त्रीवादाचे स्वरू‍ कसे असावे? यासंबंधी 'हेलन सिझू' या पाश्चात्य लेखिकेची भूमिका मंगला वरखेडे उद्धृत करतात. त्यांच्या मते, "स्त्रियांचे साहित्य हे एकाच वेळी सर्व बाजुंनी विकसित होत जाणारे लेखन असले पाहिजे."[4] अर्थात पुरूषी वर्चस्वाला सर्व बाजूने हादरे देणे हे स्त्रीवादी साहित्याचे वैशिष्ट्या आहे. तसेच पुरूषी वर्चस्वाला प्रतिवाद करून नव्या पर्यायाची मांडणी स्त्रीवादी साहित्य करते.

स्त्रीवादी साहित्याला जगण्याचा आधार आहे. कारण पुरूषाला स्त्राीविशिष्ट अनुभव केवळ कल्पनांच्या आधारावर मांडणे शक्य नाही. स्त्रियांचे ऋतुप्राप्तीचे अनुभव, गर्भधारणा, मातृत्व हे स्त्रीशरीरनिष्ठ अनुभव आहेत. म्हणून स्त्रीचा देहनिष्ठ अनुभव हा तिचा स्वतःचा आहे. स्त्रीचे शरीर पुरूषापेक्षा भिन्न आहे. त्यामुळे अनुभवांबरोबर त्यांची अभिव्यक्तीही वेगळीच असणार आहे. या वेगळेपणाची व स्वतःमध्ये असणाऱ्या उर्जास्त्रोतांची जाणीव झाल्यास स्त्री स्वतःचा शोध घेते. या संदर्भात शरणकुमार फिबाडे म्हणतात, "की कोन या घराव माझे स्थान काय? माझ्या जीवनाचा अर्थ काय? असे प्रश्न स्त्रियांना पडू लागले."[5] त्यामुळे साहित्याला प्रश्नार्थक व आत्मशोधात्मक स्वरूप प्राप्त होते. तसेच व्यक्ती म्हणून स्वतःचा शोध घेण्याची प्रक्रिया वाढते.

वरील स्त्रीवाद व स्त्रीवादी साहित्याच्या स्वरूपाचा अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंधातून स्त्रीवादी मराठी कादंबरीचा परामर्श घ्यावयाचा आहे.

स्त्रियांनी कथा लेखनाबरोबरच विपूल प्रमाणात कादंबरी लेखनही केलेले दिसून येते. यातून त्यांनी स्त्रीशक्तीच्या जाणिवा प्रखरपणे मांडल्या आहेत. सुरूवातीला स्त्रियांनी लिहिलेल्या कादंबऱ्या या 'संकट–साहस–सुटका' या पठडीतल्याच होत्या. केवळ मनोरंजन, अद्‌भूतता यांचे वलय या प्रकारच्या कादंबऱ्यांना होते. "1850 ते 1950 या शंभरीत जवळपास शंभर कादंबऱ्या प्रकाशित झाल्या."[6] असे विद्या देवधर यांनी 'स्त्री साहित्याचा मागोवा' या ग्रंथात म्हटले आहे. या कादंबऱ्यावर शौर्यकथा, प्रेमकथा, आरंभकालीन कादंबरीकारांचे आकर्षण होते. साळूबाई तांबेकर, गोदाबाइ पंडित यांच्यासारख्या आरंभकालीन लेखिकांच्या कादंबऱ्या प्रस्तुत चौकटीतल्या होत्या. त्यानंतर मात्र स्त्रीच्या वास्तव जीवनातील विविध घटनाप्रसंगाकडे लेखिका वळल्या. स्त्रीलिखित कादंबरी सामाजिक अंगाने फुलत गेली. कुमुदिनी रांगणेकर, लीला देशमुख यांच्या कादंबऱ्यातून केविलवाणी स्त्री येत नाही तर ती बंडखोरवृत्तीची येते. स्त्रीचे राज्य चालविणारी नायिका काशीबाई कानिटकरांनी रंगविली. त्यातूनच स्त्रीशक्तीची जाणीव प्रकट होते.

याच काळात लेखिकांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व, आर्थिक स्वावलंबन हे प्रश्नही हाताळावयास सुरूवात केली. काशिबाई कानिटकर यांनी 'रंगराव' (1903) या कादंबरीतून स्त्री शिक्षणाचा प्रश्न मांडला. यशोदाबाई भट यांनी 'मुलांचे बंड' (1921) मधून विधवांच्या समस्या मांडल्या. स्त्रीस्वातंत्र मानवता याबाबत त्यांनी काही प्रश्न मांडले आहेत. कमलाबाई सोहनी यांनी 'हाच का धर्म' (1930) मधून मुलींवर होणारे संस्कार यांचा वेध घेतला आहे. संस्कारहीनतेमुळे मुलींची होणारी अवस्था मांडण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. या संदर्भात विद्या देवधर म्हणतात, "सदोष मांडणीमुळे या काळातील स्त्री कादंबरीकारिकांचा प्रयत्न फरसलेला दिसतो."[7] त्यांचे हे मत यथार्थ वाटते.

पिरोज आनंदकर 'माझं बाळ ते' (1927) मधून अनाथ मुलांना दत्तक घेऊन स्त्रीने अपल्या मातृत्वाला साकार करावे असा विचार मांडते. शांताबाई नाशिककर यांनी बरेच कादंबरी लेखन केले आहे. 'कौमुदी' (1926), 'लग्नाचा बाजार' (1929), 'हाच का धर्म' (1930) इत्यादी. याशिवाय कमलाबाई बेबेवाले यांनी बंधमुक्त (1930) मधून घटस्फोटांचा प्रश्न मांडून घटस्फोटाची जोरदार मागणी केली आहे. विवाहसंस्थेमध्ये स्त्रीच्या बुध्दीचा कोंडमारा होतो. स्त्रियांना बंदिवान करणारा हा पिंजरा आहे असे परखड विचार 1930 च्या काळात मांडण्याचे धाडस त्यांनी दाखविले होते. विभावरी शिरूरकर (मालतीबाई बेडेकर) यांनी आपल्या कादंबऱ्यातून दलितांचे वास्तववादी दर्शन घडविले. त्यांची 'बळी' (1950) ही कादंबरी त्या काळात अधिक लोकप्रिय व चर्चेचा विषय बनली होती.

यानंतरच्या काळात कादंबरीचे क्षेत्र विस्तारत जाऊन कादंबरी लेखिकांची संख्याही वाढत गेली आणि आशयविश्वही विस्तारत गेले. प्रेमाकटक यांच्या कादंबऱ्या राजकीय क्षेत्रातील निष्ठावान कार्यकर्त्यावर प्रकाश टाकतात. शाली सरदार यांची कादंबरी अंधश्रध्देचा बुरखा फाडते. उषामंत्री यांनी कादंबरी व्यभिचाराचे समर्थन करते. कुमुदिनी रांगणेकर यांनी परकीय कादंबऱ्यांची भाषांतरे करून परकीय समाजजीवनाची ओळख करून दिली. आनंदीबाई जयवंत यांची कादंबरी, कुमारी माता, सरस्वती दाभोळकर यांची कादंबरी पुरूषांच्या द्वितीय विवाहामुळे स्त्रियांवर होणारा अन्यायाचा प्रश्न उपस्थित करते.

साठोत्तरी मराठी कादंबरीक्षेत्रात ग्रामीण, दलित असे वाङ्मयप्रवाह निर्माण झाले. याच काळात स्त्रीवादी साहित्यकारांनी ही आपले अस्तित्व संक्रमित करण्यात सुरूवात केली. 1975 नंतरचा स्त्रीवादी भूमिकांचा प्रभव स्त्रीवादी साहित्यातून अधिक व्यापक होत गेलेला दिसून येतो. त्याचे पडसाद स्त्रीवादी कादंबऱ्यातून उमटू लागले. आधुनिकतावादातून स्त्रीवाद असा हा प्रवास प्रस्तुत कादंबऱ्यांचा केंद्रबिंदू आहे.

आधुनिकतेची संकल्पना युरोपात धर्मसुधारण आणि प्रबोधन यांच्या चर्चेतून पुढे आले. आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या वाढत्या चर्चेतून पुढे आली. आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या वाढत्या सर्चस्वातून तिचा समाजावर होणारा परिणाम यांचा अभ्यास होऊ लागला. कला, साहित्य, संस्कृती, समाजकारण, राजकारण, अर्थकारण यासारख्या जीवनाच्या सर्वच क्षेत्रात आधुनिकतेची चर्चा सुरू झाली. या आधुनिकतेची सरळ व्याख्या म्हणजे, "रूढी आणि परंपरा यांच्या विरोधात निर्माण केलेल्या गोष्टी म्हणजे आधुनिकता."[8] स्त्रीवादी कादंबरीत या आधुनिकवादाने प्रवेश केला. समाजजीवनात परिवर्तनचे युग आले. प्राचीन रूढी व परंपरा यांना छेद देण्यात येऊ लागले. या रूढी परंपरेने स्त्रियांभोवती जो गुलामीचा विळखा घातला होता त्यातून स्त्रीला मुक्त करण्यासाठी साहित्यरूपी शस्त्र उभारण्यात आले. त्यातूनच 1980 नंतरची स्त्रीवादी कादंबरी एक वेगळा प्रबंध घेऊन अवतरू लागली.

या संदर्भात डॉ. सरोजिनी वैद्य म्हणतात "या काळातील कादंबरीचा आशय बदलला, रूप बदलले. या काळातील स्त्रियांचे कादंबरीचा आशय बदलला, रूप बदलले. या काळातील स्त्रियांचे कादंबरी लेखन हे स्त्री सुधारणेककडून स्त्री स्वातंत्र्याकडे विकसित होताना जाणवते. आजवर दडपून गेलेल्या लैंगिक भावनाही धीटपणे स्त्रियांनी मांडण्यास सुरूवात केली."[9] अशाप्रकारे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात पुरूषाच्या बरोबरीने वावरताना येणारे अनुभव हे आजवरच्या अनुभवापेक्षा वेगळे होते.

नवसाहित्यातील 'परमात्या' कमल देसाई यांच्या कांदबऱ्यातून व्यक्त होताना दिसते. हॅट घालणारी बाई (1970) 'रात्रंदिन आम्हा' (1964) इत्यादी कादंबऱ्यातून त्यांनी अस्तित्ववादी पेरणी केली आहे त्याचप्रमाणे या कालखंडातील कादंबऱ्यातून शिक्षणामुळे, राजकीय हक्कांमुळे स्त्रीविषयक कायद्यामुळे स्त्रीची पारंपारिक प्रतिमा बदललेली दिसते. अर्थार्जनामुळे तिचे स्थानही बदलले आहे.

तिलाही निर्णय होण्याचा अधिकार आहे याची जाणीव व्यक्त होतांन दिसते. स्त्रियांचा संघटित आवाज, स्त्री–पुरूष विषमतेवर हल्ला, जुन्या पुरूषसत्ताक मूल्यांचा उपहास इत्र विषय या कादंबऱ्यातून व्यक्त होतात.

महिला वर्ष व महिला दशकाने स्त्रियांच्या कार्याला गती मिळाली. स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरूध्द स्त्रिया संघटितपणे आवाज उठवू लागल्या. पारंपारिक पुरूषप्रधानतेच्या मूल्यांना तकलादू ठरवून स्वतःकडे एकव्यक्ती म्हणून पाहण्याचा प्रयत्न करीत आहेत. याचे प्रतिबिंब कादंबरीतही पडलेले दिसते. यामध्ये शांता मिसळ यांची 'बेघर' (1976), गौरी देशपांडे यांच्या 'कारावासातून पत्रे' 'मध्य लटपटीत', 'एकेक पान गळावया' (1980), निर्मला देशपांडे यांची 'टिकली एवढं तळं' (1980), 'बन्सी काहे को बजायी' (1984), प्रतिभा रानडे यांची 'मानुषी' (1984), प्रिया तेंडुलकर यांची 'ज्याचा त्याचा प्रश्न' (1985), निर्मला देशपांडे यांची 'मर्ल' (1986), माधवी देसाई यांच्या 'मंजिरी', 'नियंती' (1986), शांता गोखले यांची 'रीटा वेलीणकर' (1990), जाई निंबकर यांची 'साथ' (1990), शांता योगी यांची 'परकी' (1990), प्रिया तेंडूलकर यांची 'जन्मलेल्या प्रत्येकाला' (1991), माधवी देसाई यांची 'हरवलेल्या वाटा' (1991), सानिया यांची स्थलांतर (1994), अंजली सोमण यांची 'बंदिश' (1994), आशा बगे यांची 'त्रिदल' (1994), प्रतिमा इंगोले यांची 'बुढाई' (1999) इ. कादंबऱ्या कमी अधिक प्रमाणातील स्त्रीवादी जाणिवेतून निर्माण झाल्या आहेत.

अशाप्रकारे स्त्रीवादी कादंबरीचे हे अनुभवविश्व आधुनिक जीवनातील स्त्रियांचे प्रश्न मांडून थंबत नाहीत तर त्या प्रश्नांची सोडवणूक करण्याकरिता सशक्तपणे स्त्री गायिका सामोरी जाते. पारंपारिक रंजनवाद हे मूल्य स्त्रीवादी कादंबरीने केव्हाच मागे टाकले असून 'स्त्री मुक्ती'ला प्राधान्य दिले आहेत.

## स्त्रीवादी कादंबरीतून व्यक्त होणारे वेगळेपण :

(1) प्रारंभी लिहिलेल्या कादंबऱ्या या मनोरंजनात्मक, 'संकट साहस व सुटका' या पठडीतील होत्या.
(2) प्रारंभी लेखकांनी स्त्रियांचे प्रश्न भीतभीतच मांडले.
(3) परंपरेच्या परिधानाबाहेर पडू इच्छिणारी स्त्रीची मानसिकता व्यक्त होऊ लागली.
(4) अन्याय, अत्याचाराविरूध्द बंड करण्याची प्रबळ इच्छा व्यक्त होत गेली.
(5) साठोत्तरी स्त्रीवादी कांदबरीला आधुनिकतेचा स्पर्श होत गेली.
(6) नवसाहित्यातील परात्मता व्यक्त होऊ लागली.
(7) स्त्रीविषयक कायद्यामुळे स्त्रीची पारंपारिक प्रतिमा बदलत गेली.
(8) स्त्री–पुरूष विषमतेवर हल्ला, जुन्या पुरूषसत्ताक मूल्यांचा उपहास करण्याचे सामर्थ्य स्त्री नायिकांच्या ठिकाणी आलेले दिसते.
(9) 1980 नंतरच्या कादंबरीतील नायिका, सशक्त, स्वतंत्र विचारांची निर्णयक्षमता असलेली धाडसी व्यक्तिमत्वाची दिसते.
(10) आधुनिक स्त्री रंगवितांना लैंगिक उत्तेजना निर्माण करणारी वर्णनेही बिनधास्त येतात.

अशाप्रकारे स्त्रीवादी कादंबरीतून व्यक्त होणारे आशयविश्व व मांडलेले प्रश्न सोडविण्यासाठी अंगी जे बदल हवे त्या बाबीतील चिंतन, विचार या सर्वांचे चित्रण साठोत्तरी कादंबरीतून प्रकर्षाने दिसून येते.

## समारोप :

'स्त्रीवादी मराठी कादंबरी : एक शोध' या शोधनिबंधातून प्रथम स्त्रीवादाची संकलपना स्पष्ट करण्यात आली, स्त्रीच्या आत्मजागरणचे व्यापक अभियान असे स्त्रीवादाचे स्वरूप आहे. स्त्रीचे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय अशा प्रस्थापित समाजव्यवस्थेचा प्रत्येक पातळीवरून शोषण होत असते. या शोषणविरूध्दचा आवाज व समाजात समान दर्जाची मागणी यासाठीचा वाद म्हणजे स्त्रीवाद होय. याच अनुषंगाने स्त्रीवादी साहित्यातून मराठी स्त्रीवादी कादंबरीचे बदलते आयाम लक्षात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## संदर्भग्रंथ सूची :–

१. Sign, Sushila, Feminism, Theory, Criticism, Analysis, Pencraft International Deli, First ed, 1997, Page 21.
२. जोशी लक्ष्मणशास्त्री व इतर – मराठी विश्वकोश? महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आ. 1973 पृ. 68
३. धोंगळे अश्विनी – स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपाययोजन दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे, द्वितीय आवृत्ती 2001, पृ. 6
४. लिंबाळे शरणकुमार (संपा.) साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि., पुणे, प्र. आ.2007 पृ. 100
५. वरखेडे मंगला (संपा.) – स्त्रियांची नवकथा : वाटा आणि वळणे, कैलासराणा प्रकाशन, नाशिक प्र.आ. 1995 पृ. 5.
६. परांजपे (डॉ.) तारा – मराठी कथा शंभरीतील स्त्रीचित्रण, रजत प्रकाशन, औरंगाबाद प्र.आ. 2005, पृ. 78.

७. तत्रैव, पृ. 79
८. इंगोले (डॉ.) कृष्णा, लोकसंस्कृतीतील स्त्री रूप, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्र.आ. 2004, पृ. 15
९. वैद्य (डॉ.) सरोजिनी वैद्य – स्त्री साहित्याचा मागोवा खंड 1, कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे, द्वि. आ. 2000 पृ. 116